महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: एमआयएस-०१२०/सी.आर.३१/२०२१/मा.तं. दिनांक: १६ नोव्हेंबर, २०२१

## -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय :- भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting out) पर्याय उपलब्ध करुन देण्याबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित भरतीप्रक्रियांमध्ये सुधारणा करण्याची बाब आयोगाच्या विचाराधीन होती. यासंदर्भातील प्रचलित कार्यपद्धतीचा साकल्याने विचार करुन निवडप्रक्रियेच्या कार्यपद्धतीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचा आयोगाकडून निर्णय घेण्यात आला आहे :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित सर्व भरती प्रक्रियांकरीता अंतिम शिफारशीपूर्वी सर्वसाधारण गुणवत्ता यादी (Merit List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) स्पर्धा परीक्षेद्वारे बहुसंवर्गीय पदाच्या भरतीप्रक्रियेकरीता सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे "पदांचा पसंतीक्रम" सादर करण्याची व्यवस्था तसेच "भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे" (Opting out) हा पर्याय आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल.

(३) बहुसंवर्गीय पदाच्या भरती प्रक्रियांकरीता "पदांचा पसंतीक्रम" व "भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे" हा पर्याय सादर करण्याकरीता तसेच बहुसंवर्गीय नसलेल्या इतर सर्व स्पर्धा परीक्षेद्वारे पदभरती करीता "भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे" हा पर्याय सादर करण्यासाठी सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

(४) आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उमेदवाराकडून प्राप्त पदांचे पसंतीक्रम (लागू असल्यास) अथवा "भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे" हा पर्याय लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी तयार करण्यात येईल.

(५) बहुसंवर्गीय पदभरतीकरीता पदांचे पसंतीक्रम सादर करणे तसेच सर्व स्पर्धा परीक्षेद्वारे पदभरतीकरीता "भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे" याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य असेल. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

**२.** भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प सादर करण्यासंदर्भातील उपरोक्त कार्यपद्धत केवळ स्पर्धा परीक्षांकरीता लागू राहील. विशिष्ट अर्हता/विशिष्ट अनुभव आधारित सरळसेवा भरतीकरीता उपरोक्त निर्णय लागू करण्यात येणार नाही.

**३.** भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याबाबतचा सदर निर्णय सर्व प्रलंबित तसेच यापुढील सर्व स्पर्धा परीक्षांच्या निकाल प्रक्रियेपासून लागू राहील. तसेच, त्याप्रमाणे आयोगाच्या कार्य नियमावलीमध्ये सुधारणा करण्यात येईल. सदर सुधारणा होईपर्यंतच्या कालावधीत कार्यनियमावलीमध्ये सुधारणा झाली आहे; असे समजून प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

ठिकाण : मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial